**नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा बँकींग व्यवहार व त्यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीबाबत सूचना - टीजेएसबी सहकारी बँक मर्यादित......**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१४/नवि-०४**
**मंत्रालय, मुंबई- ४०००३२.**
**दिनांक :- ९/४/२०२६.**

**संदर्भ :-**

१) वित्त विभाग , शासन निर्णय क्र. शासाऊ-१०.१५/ प्र.क्र.४२/सा.ऊ., दिनांक २७ ऑक्टोबर , २०१५.
२) नगर विकास विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्र.लोलेस-२०१६/प्र.क्र.८७०/नवि-३१, दि. ०२ मार्च २०१७.
३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.लोलेस-२०१९/प्र.क्र.४८/नवि-०४, दि. २८ मे, २०१९.
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा५, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३.
५) नगर विकास विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दिनांक १४/०२/२०२४.
६) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २०२५/प्र.क्र.११/कोषा प्रशा-५, दिनांक २४/११/२०२५.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक क्षेत्रे अधिनियम १९६५ च्या विविध कलमांमध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडील निधी / शिल्लक / अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीबाबत तरतूद विहीत करण्यात आली आहे. तत्तेच, प्रस्तुत तरतूदी व मा. लोकलेखा समितीच्या शिफारशी विचारात घेऊन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र किंवा राज्य शासनाच्या योजनेमधून अथवा राज्य शासनाच्या विविध विकास विषयक कार्यक्रमासाठी राज्य शासनाकडून वितरीत करण्यात येणाऱ्या निधीबाबत व त्यांच्याकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीबाबत सूचना संदर्भाकित अ.क्र. २ , ३ व ५ अन्वये देण्यात आल्या आहेत.

वित्त विभागाच्या संदर्भाकित अ.क्र.६ येथील शासन निर्णयाद्वारे, सन २०२५-२०२६ साठी शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन व भत्त्यांचे प्रदान करण्यासाठीचे आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन व भत्ते बँक खाते, आणि निवृत्तीवेतनधारकांचे वैयक्तिक निवृत्तीवेतन बँक खाते उघडण्यास राज्य सार्वजनिक उपक्रम व महामंडळे यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतविण्यासाठी तसेच शासकीय कार्यलयांच्या आणि राज्य सार्वजनिक उपक्रम व महामंडळांच्या सर्व प्रकारच्या बँकींग व्यवहारांसाठी टीजेएसबी सहकारी बँक मर्यादित या नागरी सहकारी बँकेस मान्यता दिलेली असून, सदर शासन निर्णयातील तरतुदी राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या बैंकिंगविषयक व्यवहारांसाठी व त्यांच्याकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीबाबत सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८३ व ९२ तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक क्षेत्रे अधिनियम १९६५ च्या कलम ९० व ९९ मधील तरतूदी, संदर्भाधिन क्र. २ , ३ व ५ येथील सूचना तसेच वित्त विभागाच्या शा. नि. दिनांक २४/११/२०२५ मध्ये नमूद अटी व शर्तीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

I. सन २०२५-२०२६ साठी शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन व भत्त्यांचे प्रदान करण्यासाठीचे आहरण व संवितरण अधिकारी यांचे वेतन व भत्ते बँक खाते, आणि निवृत्तीवेतनधारकांचे वैयक्तिक निवृत्तीवेतन बँक खाते उघडण्यास राज्य सार्वजनि क उपक्रम व महामंडळे यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतविण्यासाठी तसेच शासकीय कार्यलयांच्या आणि राज्य सार्वजनिक उपक्रम व महामंडळांच्या सर्व प्रकारच्या बँकींग व्यवहारांसाठी टीजेएसबी सहकारी बँक मर्यादित या नागरी सहकारी बँकेस वित्त विभागाने संदर्भ क्र. ६ द्वारे पात्र केले आहे. सदर मार्गदर्शक तत्वे / सूचना राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या बँकीग व्यवहारासाठी व त्यांच्याकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीसाठी लागू राहतील.

II. बँकीग विषयक व्यवहारांच्यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांनी संदर्भाकित क्र.६ मधील सर्व निकषांची पूर्तता होत असल्याची खात्री करुनच जाणीवपूर्वक निर्णय घ्यावा.

III. अशा अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीबाबतचे अधिकार हे महानगरपालिका/नगरपरिषदा अधिनियमामध्ये विहीत केल्यानुसार राहतील.

२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीमधून संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आर्थिक नुकसान होऊ नये याची दक्षता घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित आयुक्त, महानगरपालिका व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत यांची राहील.

३. प्रस्तुत शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०४०९१७०३०२४७२५ असा आहे. प्रस्तुत शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यापाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUSHILA
DHONDIRAM PAWAR

Digitally signed by SUSHILA DHONDIRAM PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=be0660f27b88fa30c14d66b8296a2c28478562c6fd9d1d360094fe11409501d5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2D78E8AB53FB3619E69D852CE1492593ABC1DCE1DF4E081AFE790194FB65C97B, cn=SUSHILA DHONDIRAM PAWAR
Date: 2026.04.09 17:03:58 +05'30'

**( सुशिला पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. उपमुख्यमंत्री ( नगर विकास ), यांचे प्रधान सचिव.
२) मा.राज्यमंत्री ( नगर विकास ) , यांचे खाजगी सचिव.
३) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन.
६) आयुक्त व संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय ,नवी मुंबई.
७) संचालक, नगर रचना, नगर रचना संचालनालय, पुणे.
८) सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.
९) महालेखापाल कार्यालय, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

११) सर्व जिल्हाधिकारी

१२) आयुक्त, सर्व महानगरपालिका

१३) सर्व उप / सहायक संचालक, नगररचना

१४) मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायती.

१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१६) अपर मुख्य सचिव, नगर विकास-१ विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

१७) अपर मुख्य सचिव, नगर विकास-२, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

१८) सर्व सह सचिव / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१९) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०) निवडनस्ती, नवि-४ कार्यासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

******